## शैक्षणिक शुल्क आकारणी :

अध्यापक विदयालयास मान्यता मिळाल्या पासून चार वर्षा पर्यंत प्रचलित दर रु. १२००० प्रमाणे फी आकारणी करता येईल.

चार वर्ष पूर्ण झालेले अध्यापक विदयालयांना सुधारीत दर रु. १५०००/- प्रमाणे शुल्क आकारणी करण्यासाठी पुढील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. अध्यापक विदयालयासाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा व अटी शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२. कर्मचा-यांचे वेतन बँकेमार्फत होणे आवश्यक आहे.
३. मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट आवश्यक आहेत.
४. एन.सी.टी.ई. च्या निकषा प्रमाणे कर्मचारी नियुक्ती आवश्यक आहे.
५. मागील वर्षाचा निकाल ८० टक्के आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे शुल्क निश्चिती प्रस्ताव जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेकडे अध्यापक विदयांलयांचे प्राचार्यांनी तीन प्रतीत सादर करावयाचे आहेत. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यांनी सदर प्रस्तावाची छाननी करुन आपले स्वयंस्पष्ट शिफारस व अभिप्रायासह दोन प्रतीत प्रस्ताव प्रस्तुत कार्यालयाकडे एकत्रित जिल्हयाचे सादर करावयाचे आहेत.